# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 20/09/2023 (बुधवार) दुपार

---

## पोलीस स्टेशन कन्हान हद्दीतील गाडेघाट शिवारात फार्म हाऊसवर जुगार खेळणारे व त्यांना जुगार खेळण्यासाठी प्रवृत्त करणारे इसमांविरुद्ध कन्हान पोलीसांची कार्यवाही

दिनांक १९/०९/२०२३ व २०/०९/२०२३ चे रात्री दरम्यान मौजा गाडेघाट (जुनी कामठी ता. पारशिवनी) शिवारातील अम्मा दर्गाहिचे मागे असलेल्या ‘‘ कामडे फॉर्म हाऊस ’’ येथे काही जुगारी लोक ५२ तास पत्त्यावर पैश्याची बाजी लावुन हार जीतचा जुगार खेळत आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनात वरीष्ठ पोलीस निरिक्षक, सार्थक नेहेते व सोबत पोलीस स्टाफ सहायक पोलीस निरीक्षक चेतनसिंह चौहाण, पराग फुलझेले, पोलीस हवालदार मुदस्सर जमाल, पोलीस नायक अमोल नागरे, अतिश मानवटकर, अनिल यादव, पोलीस अंमलदार नविन पाटील, आकाश शिरसाट, अश्विन गजभिये यांचे तसेच दोन पंचासह मौजा गाडेघाट अम्मा दर्गाचा मागे ‘‘ कामडे फॉर्म हाऊस ’’ येथे पोहचल्यावर सदर फॉर्म हाउसचे पटांगणात काही जुगारी लोक ५२ तासपत्यावर पैश्याची बाजी लावुन हार जीतचा जुगार खेळतांना दिसुन आल्याने घेराव टाकुन धाड टाकली असता सदर ठिकाणातुन एकुण ०८ जुगारी इसम नामे १) नवाब अब्दुल जफार अन्सारी वय ३१ वर्ष रा. कोळसाटाल कामठी, २) सैय्यद शानु सैय्यद इकबाल वय ३० वर्ष रा. भोई लाइन कामठी, ३) मोहम्मद सलमान मोहम्मद अफजल वय २३ वर्ष रा. बी. बी कॉलोनी कामठी, ४) आदित्य रोशन मानवटकर, वय १८ वर्ष रा. नविन येरखेडा कामठी, ५) गुड्डु असलममुल्ला असगर शेख वय ३९ वर्ष रा. नया बाजार कामठी, ६) मोहसिन खान शेख गफ्फार वय ३७ वर्ष रा. फुटाना ओली कामठी, ७) अली अहमद महमुद अहमद वय २५ वर्ष रा. लकडगंज कामठी, ८) शेख इरफान शेख मकसुद वय ३१ वर्ष रा. भाजीमंडी कामठी तसेच त्यांना कामडे फॉर्म हाऊस मध्ये जुगार खेळण्यासाठी बोलावुन जुगार खेळण्यासाठी प्रवृत्त करणारा इसम नामे शांतीलाल तुकाराम पगारे वय ४६ वर्ष रा. सर्राखा बोर्डा ह. मु कामडे फॉर्म हाऊस यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडुन ५२ तास पत्ते, रोख ११,९६०/— रु , एकमेकांना संपर्क करुन एकत्र येवुन जुगार खेळण्यासाठी वापरलेले एकुण ९ मोबाईल ६९,०००/— रु. तसेच आपआपले वास्तव्यातुन सदर फार्म हाऊस मध्ये पोहचण्यासाठी वापरलेले एक तीन चाकी वाहन व ४ मोटर सायकल किंमती ३,७०,०००/— रु असा एकुण ४,५०,९६०/— रु चा मुद्देमाल जप्त करुन त्यांचे विरोधात पोलीस स्टेशन कन्हानला गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष. ए. पोद्दार साहेब, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. संदीप पखाले साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. पुंडलिक भटकर साहेब, यांचे मार्गदर्शनात व पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते, सहायक पोलीस निरीक्षक चेतनसिंह चौहाण, पराग फुलझेले, पोलीस हवालदार मुदस्सर जमाल, पोलीस नायक अमोल नागरे, अतिश मानवटकर, अनिल यादव, पोलीस शिपाई नविन पाटील, आकाश शिरसाट, अश्विन गजभिये यांनी केली.

## कुख्यात कोळसा माफिया यास ६ महीन्यासाठी नागपुर ग्रामीण जिल्हयातुन हद्दपार

पोलीस स्टेशन कन्हान हद्दीतील टेकाडी गावात राहणारा कोळसा माफीया व सराईत गुन्हेगार नामे “ भुजंग जनार्धन महल्ले ” याचे गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्याचे उद्देशाने व परिसरातील नागरिकांचे मनात त्याचे विरुद्ध निर्माण झालेले दहशतीचे प्रभाव संपविण्याचे उद्देशाने त्याचे विरुद्ध कन्हान पोलीसांकडुन कलम ५६(१)(ब) महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये ईस्तगाशा तयार करुन मा. वरिष्ठ पोलीस अधिकारी साहेबांचे मार्फतीने मा. उपविभागीय अधिकारी साहेब रामटेक यांच्याकडे पाठविण्यात आले होते.

सदर प्रकरणी मा. उपविभागीय अधिकारी साहेब रामटेक यांनी सुनावनी अखेर सदर ईसमास नागपुर ग्रामीण जिल्हयातुन ६ महीन्यासाठी हद्दपार केल्याचे आदेश पारित केल्याने सदर ईसमावर सदरचे आदेश तामील करुन त्यास त्याचे नातेवाईकांकडे तुमसर जिल्हा भंडारा येथे पाठविण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक साहेब नागपुर ग्रामीण श्री. संदीप पखाले साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब श्री. पुंडलिक भटकर साहेब यांच्या मार्गदशनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सार्थक नेहेते, सपोनि/चेतनसिंह चौहाण, पो.हवा/जमाल मुदस्सर,हरिष सोनभद्रे, पोना/अमोल नागरे, अनिल यादव, पोशि/अश्विन गजभिये, आकाश सिरसाट, नवीन पाटील यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**